Rotary
Club of Beed Midtown

# MIRROR

UNITE FOR GOOD Rotary

अंक-१ | Club No. 27961 | RI Year 2025-26 | दि. ०७ जुलै २०२५

## रोटरी मित्रांनो! सक्रीय रहा, प्रेरित रहा आणि रोटरीच्या कार्यात नियमितपणे सहभागी व्हा!



प्रिय रोटरी परिवार !

रोटरी क्लब ऑफ बीड मिडटाऊन यांना त्यांच्या पहिल्या बुलेटिनच्या प्रकाशनाबद्दल मनापासून शुभेच्छा! या बुलेटिनद्वारा आपल्या कार्याची विविधता, यशस्वीता आणि रोटरीचे मुल्ये समाजासमोर मांडण्याची चांगली संधी आहे. या बुलेटिनमधील विविध गतीविधी, डिस्ट्रीक्ट-३१३२ च्या बातम्या आणि रोटरी आंतरराष्ट्रीय माहिती वाचल्याने प्रत्येक रोटरीयन आणि त्यांच्या परिवारास रोटरीच्या विविध पैलूची अधिक चांगल्या पद्धतीने माहिती मिळेल. हे बुलेटिन केवळ माहितीपुरतेच नाही तर प्रत्येक वाचकांना अधिक जाणकार आणि प्रेरित रोटरीयन बनवते. हे बुलेटिन जास्तीत जास्त मित्र, परिवार आणि समाजामध्ये पोहच करावे, जेव्हा लोकांना रोटरीने समाजासाठी केलेल्या कामाची माहिती वाचायला मिळेल. तेव्हा रोटरीची प्रतिमा आणि प्रतिष्ठा आणखीन वाढेल.

यावर्षी रोटरी इंटरनॅशनल अध्यक्षाचा मॅसेज "Unite for Good" या संदेशाने आपल्याला प्रेरणा मिळते. या घोषणेप्रमाणे, आपण सर्वजण एकत्र येऊन सिमा ओलांडून विभागामध्ये आणि समाजामध्ये सहकार्याने स्थायी आणि सकारात्मक बदल घडवूया. रोटरीचे सामुहिक सामर्थ्य आणि एकता आपल्याला जगात सकारात्मक बदल घडण्याची ताकद देते.

रोटरी इंटरनॅशनलच्या नियोजनानुसार स्थानिक आणि जागतिक शांतता आणि सामंजस्य निर्माण करणे, रोटरीची क्षमता वाढवणे आणि सार्वजनिक प्रतिमा उजळवणे याचा प्रयत्न केला पाहिजे. आपण अधिक प्रभावी, नाविन्यपूर्ण मार्ग निवडणे आणि सामुहिक प्रयत्न करावेत. जेणेकरून आपल्या समाजात आणि जगात चांगले परिवर्तन घडवता येईल. आम्ही या योजनेच्या दिशेने पुढे जाताना विविधता, समरसता आणि समावेशकता (D.E.I.), या मुल्यांना जागरुकपणे स्वीकारण्याचा आग्रह करतो. या मुल्याने आपली वाढ आणि यशस्वीता निश्चित होते. तसेच रोटरीची चतु:रंग जीवनदृष्टी-खरेपणा, न्याय, चांगुलपणा आणि उपयुक्तता या मुल्याला जपणे ही आपली जबाबदारी आहे. तुम्हा सर्व सदस्यांचं कौतुक करतो. विशेषत: बुलेटिन संपादक आणि प्रकाशन टिमला कारण त्यांची मेहनत आणि समर्पण या पुढील आवृत्तीसाठी आधारभूत आहे. भविष्यातही अशाच प्रेरणादायक आणि माहितीपुरक आणि प्रभावी प्रकाशनाची आशा ठेवतो. शेवटी "Servic Above Self" हे लक्षात घेऊन तुम्हाला आव्हान करतो की, सक्रीय रहा, प्रेरित रहा आणि रोटरीच्या कार्यात नेहमी सहभागी व्हा. "Unite for Good" या घोषणेखाली एकत्र येऊन आपण नक्कीच समाजात मोठा फरक निर्माण करू शकतो. आपल्या यशस्वी भविष्यासाठी हार्दिक शुभेच्छा!

आपला, रो. सुधीर आणि संगिता लातुरे
डिस्ट्रीक्ट गव्हर्नर आरआयडी-३१३२



RI President :
Rtn. Francessco Arezzo



District Governor :
Rtn. Sudhir Lature



Assitant Governor :
Rtn. Kalyan Kulkarni



President
Rtn.Er. Rahul Bora



Secretary
Rtn.Dr. Prakash Konka



Editor :
Rtn.Balaji Gharat

## रोटरीच्या ध्येयाशी एकनिष्ठ राहुन, आपण सेवा सौहार्द आणि नवसृजनशीलतेच्या माध्यमातून सकारात्मक उर्जा निर्माण करावी



प्रिय रोटरीयन बांधवांनो!

रोटरी इंटरनॅशनलच्या वतीने रोटरी क्लब ऑफ बीड मिडटाऊनला नवीन वर्ष २०२५-२६ साठी मन:पूर्वक शुभेच्छा देतो. आपण रोटरी इंटरनॅशनल डिस्ट्रीक्ट ३१३२ चा अभिमानास्पद भाग आहात. गेल्या वर्षभरात आपल्या जिल्ह्यातील रोटरी क्लबांनी उल्लेखनीय कार्य केले असून, सामाजिक बदल घडवण्यासाठी आरोग्य, शिक्षण, स्वच्छता, पर्यावरण संवर्धन, जलव्यवस्थापन आणि स्त्री सशक्तीकरण या सारख्या क्षेत्रामध्ये ठसा उमटवला आहे. या कार्यामध्ये रोटरी क्लब ऑफ बीड मिडटाऊनचे योगदान अत्यंत कौतुकास्पद आहे. रो.इंजि. नितीन गोपन, रो.डॉ. निलेश जगदाळे यांनी मागील वर्षात रोटरीचे नावलौकिक केले आहे. यावर्षी "Unite for Good" या प्रेरणादायी थीमनुसार कार्य करताना आपला क्लब डी.जी. रो. सुधीर लातुरे यांच्या मार्गदर्शनाखाली अधिक प्रभावीपणे कार्य करतील याची मला पूर्ण खात्री आहे. त्यांच्या प्रेरणादायी नेतृत्वाखाली आपण एकात्मतेने काम करून समाजात सकारात्मक बदल घडवू शकाल. क्लबचे अध्यक्ष इंजि. रो. राहुल बोरा आणि सचिव रो.डॉ. प्रकाश कोंका यांचे नेतृत्व नक्कीच क्लबसाठी एक नवा दृष्टीकोन घेऊन येईल. आपल्या टीमच्या सेवाभावी वृत्तीमुळे आणि सहकार्यामुळे रोटरीचे मुल्य समाजात अधिक व्यापक स्वरुपात पोहोचेल.

रोटरीच्या ध्येयाशी एकनिष्ठ राहुन आपण सेवा सौहार्द आणि नवसृजनशीलतेच्या माध्यमातून समाजात सकारात्मक उर्जा निर्माण करावी हीच सदिच्छा.

आपलाच
फ्रान्सेस्को अरेझ्झो
अध्यक्ष, रोटरी इंटरनॅशनल २४-२५




Rotary Club of Beed Midtown
MIRROR
UNITE FOR GOOD
Club No. 27961 RI Year 2025-26

## रोटरीरत्न पी.डी.जी. डॉ.उल्हास कोल्हटकर यांचा सामाजिक रोटरी प्रवास



पी.डी.जी.डॉ.उल्हास कोल्हटकर, जिल्हा ३१४०/३१४२

१) १९८६ साली रोटरीमध्ये प्रवेश झाला. २) गृहनगर क्लब, रोटरी क्लब ऑफ डोंबिवली ईस्ट, जिल्हा-३१४२. ३) वैदिकशास्त्र/बालरोग तज्ञ (एम.डी., डी.सी.एच., एफ.सी.पी.एस.) शैक्षणिक पात्रता सर्वच पदव्युत्तर शिक्षणामध्ये सुवर्णपदक विजेते. ४) राष्ट्रीय विज्ञान प्रतिभा शिष्यवृत्तीधारक. ५) जगन्नाथ शंकरसेठ संस्कृत शिष्यवृत्ती विजेते. ६) १५ वर्ष नवी मुंबई येथील तेरणा वैद्यकीय महाविद्यालयात मानद सहकारी प्राध्यापक. ७) राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय बालरोग विषयक नियतकालिकामध्ये अनेक लेख प्रकाशित. ८) विविध सी.एम.ई. मध्ये अभ्यासपूर्ण व संशोधनात्मक व्याख्याने. ९) देशभरात विविध ठिकाणी आरोग्य कार्यशाळा घेऊन आरोग्यविषयक प्रसार केला. १०) व्यवसाय : सिद्धी हॉस्पिटल फॉर चिल्ड्रन, डोंबिवली याचे गेल्या ३६ वर्षापासून संचालक या पदावर कार्य व सेवा चालू आहे. ११) Paednest Medical Research Centre Pvt. Ltd. - व्यवस्थापकीय संचालक पदावर गेल्या १६ वर्षापासून कार्यरत. १२) लिखान कार्ये : ३४ पुस्तके (त्यापैकी ५ रोटरीविषयक, उर्वरीत योग, मानसशास्त्र, बालआरोग्य, शिक्षण, झेन तत्वज्ञान, टाईम मॅनेजमेंट आदि विषयावर लिखान कार्य पूर्ण). १३) प्रकाशित : २६० मराठी/इंग्रजी लेख वृत्तपत्र व मासिकांमध्ये प्रकाशित. १४) व्याख्याने : सुमारे ३५०० व्याख्याने (रोटरी, शिक्षण, योग, संगीत, आरोग्य, पर्यावरण, क्रीडा, तत्वज्ञान, अध्यात्म, वैयक्तिक विकास) महाराष्ट्रात, भारतात व परदेशात पूर्ण. १५) सूत्रसंचलन : २५० हून अधिक शैक्षणिक, आरोग्य, संगीत व योगविषयक कार्यक्रमाचे व्यवस्थापन. १६) नेतृत्व : जनरल एज्युकेशन इन्स्टिट्युट, मुंबई - अध्यक्ष (१३१ वर्ष जुनी संस्था- ४८ शाळा व महाविद्यालये.) १७) सोशन सिक्युरिटी फोरम : हार्मनी होलिस्टिक हेल्थ फाऊंडेशन, योग विद्या धाम, ब्राम्हण सभा, इंडियन मेडिकल असोसिएशन, वनवासी कल्याण आश्रम (डोंबिवली माजी अध्यक्ष). १८) दूरदर्शन मुंबई वर एप्रिल २०२१ मध्ये अमृताचा वेलू या शीर्षकाने विशेष माहितीपर प्रसारित. १९) रोटरीमध्ये विशेष कार्य : A. क्लब अध्यक्ष (१९९२-९३) जिल्ह्यातील सर्वोत्तम अध्यक्ष पुरस्कार. B. जिल्हा गव्हर्नर म्हणून २००७ ते ०८ या वर्षी पदभार पूर्ण. २०) महत्वपूर्ण कामगिरी : टी.आर.एफ. योगदान. $ २.५५ मिलीयन- जागतिक स्तरावर सर्वाधिक देणगी देण्याचा विक्रम. २१) ११ नवीन रोटरी क्लबची स्थापना करून रोटरीचा प्रचार आणि प्रसार केला. २२) रोटरी शिक्षणावरील १० पुस्तके व १६ सि.डी. प्रकाशित करुन रोटरीच्या ज्ञानात भर घातली. २३) पी.डी.जी. म्हणून भूमिका : झोन ४ व ६ A मधील २२ जिल्ह्याचे रोटरी कोऑर्डीनेटर (२०११-१४), आर.एल.आय. साऊथ एशियामध्ये बोर्ड सदस्य, टी.आर.एफ. Meritorios Service (२००८-०९) आणि Service above Self (२०१२-१३) पुरस्कार. जी.ई.टी.एस. प्रशिक्षक (२०११ पासून), आर.ए.जी.एम. संचालक, आर. आय. एल. एम. राष्ट्रीय समिती सदस्य, टी.आर.एफ. कॅडर, २००४ मध्ये टी.आर.एफ.चा सर्वोत्तम पुरस्काराने सन्मानित. २४) महत्वाचे सामाजिक कार्ये : डोंबिवली रत्न पुरस्कार, आय.एम.ए. डॉक्टर, लेखक पुरस्कार, महापौर पुरस्कार-२०१०, चतु:रंग पुरस्कार- २०११, आदर्श डोंबिवलीकर पुरस्कार- २०१२.

२५) पत्नी : रो. वर्षा कोल्हटकर (एम.बी.बी.एस., डी.सी.एच.) २७ वर्षापासून बालरोग तज्ञ, सिद्धी नर्सिंग होम डोंबिवली मालक, २ पुस्तकाच्या लेखिका, वक्त्या, शिक्षक, टी.व्ही.वर, रेडिओवर अनेक कार्यक्रमे. २६) मुलगी केतकी : पोस्ट ग्रॅज्युएट (क्लिनिकल बायोटेक्नॉलॉजी-यु.के., बायोइन्फॉर्मेटिक स्कॉटलँड, उत्तम गायक.

## "सेवा हीच खरी प्रतिष्ठा" या ब्रीदवाक्याचा खरा अर्थ या वर्षभराच्या कार्यातून उलगडत गेला-रो.नितीन गोपन



प्रिय रोटरीयन मित्रांना सप्रेम नमस्कार!

माझ्या अध्यक्षपदाच्या या कालखंडाचा शेवट होत असताना, माझ्या मनात एक वेगळीच भावना निर्माण झाली आहे. समाधान, कृतज्ञता आणि एक सकारात्मक ऊर्जा. रोटरी क्लब ऑफ बीड मिडटाऊनच्या अध्यक्षपदाची जबाबदारी स्वीकारताना मनात खुप योजना, संकल्प आणि थोडीशी काळजी होती. पण आज मागे वळून पाहताना वाटते की, आपल्या सर्वांच्या सहकार्यामुळे हा प्रवास अत्यंत यशस्वी आणि स्मरणीय ठरला. यावर्षात आपण अनेक उपक्रम यशस्वीरित्या पार पाडले. उदा. आरोग्य शिबीर, वृक्षारोपन, विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती वाटप, पाणी प्रकल्प या सर्व उपक्रमांतून समाजासाठी काहीतरी करण्याचा खरा आनंद मिळाला. माझ्या या प्रवासात मला सतत प्रेरणा देणारे, मार्गदर्शन करणारे आणि साथ देणारे सर्व रोटरी सदस्यांचे व माझे सहकारी सचिव यांचे मी मन:पूर्वक आभार मानतो. पुढील वर्षातील अध्यक्ष व सचिव यांना मनापासून शुभेच्छा!

## रोटरीने मला सेवा आणि नेतृत्व याचं एक अनोखं व्यासपीठ दिलं -रो.डॉ.निलेश जगदाळे



प्रिय रोटरीयन मित्रांना सप्रेम नमस्कार!

माझ्या सचिवपदाच्या कार्यकाळात रोटरीच्या विविध उपक्रमाचा भाग होण्याची, संघटनात्मक जबाबदारी पार पाडण्याची आणि समाजोपयोगी कार्यात सक्रीय सहभाग घेण्याची संधी मिळाली याचा मला विशेष आनंद आणि अभिमान वाटतो. गेल्या वर्षभरात क्लबच्या अध्यक्षांच्या मार्गदर्शनाखाली आणि सर्व सदस्यांच्या सहकार्याने अनेक सामाजिक, आरोग्यविषयक, शैक्षणिक व पर्यावरणपुरक उपक्रम यशस्वीरित्या राबवता आले. हे सर्व कार्य एकट्याचे नव्हते ही एक सामाजिक वाटचाल होती, ज्यामध्ये प्रत्येकांनी आपली भूमिका प्रामाणिकपणे पार पाडली. या वर्षात मी अनेक गोष्टी शिकलो. संघटन कौशल्य, लोकांशी संवाद, अहवाल लेखन, वेळेचे नियोजन आणि सर्वात महत्वाचे म्हणजे सेवा हेच आमचे कर्तव्य ही रोटरीची खरी भावना अनुभवली. रोटरी क्लबने मला सेवा आणि नेतृत्व याचं एक अनोखं व्यासपीठ दिलं यासाठी मी सदैव ऋणी राहील. नवीन अध्यक्ष, सचिव व कार्यकारिणीला मन:पूर्वक शुभेच्छा देतो. क्लब अजुन उंच शिखर गाठो हीच अपेक्षा.

### रोटरी परिवारात नवीन मेंबर्सचे हार्दिक स्वागत!

| | | |
|---|---|---|
| रो.डॉ.वरद चरखा, | रो.ॲड.धिरजसिंग भंडारी | रो.संतोष वानरे |
| रो.डॉ.स्वप्नील उन्हाळे | रो.इंजि. प्रतिक भोपळे | रो.फारुख सय्यद |
| रो.डॉ.महेश काळे | रो. विशाखा सुर्यवंशी | रो.रमेश चव्हाण |
| रो.डॉ. शिवाजी मोरे | रो.ॲड.शहाजी जगताप | रो.डॉ.जीवन चव्हाण |
| रो.डॉ. अजय घोडके | रो. राजु थोबडे | रो.इंजि.अक्षय घोडके |
| रो. गोविंद लोळगे | रो.सौ.संगिता कोंका | रो.इंजि.संतोष सानप |
| रो.इंजि.आकाश जैन | रो.सौ. साधना बोरा | रो. राजेश लुनावत |
| रो.इंजि. रवि वारे | रो.इंजि.संजय खांदाट | रो. प्रकाश घोलप |
| रो.इंजि.संकेत तांदळे | रो.कलिम जहाँगीर | रो.इंजि.श्रीपाद चिंचोलकर |
| रो. संजय सरोदे | रो.मिलींद करमाळकर | रो. सुरेंद्र कासट |








Raj Beldar Const.
& Developer's
Raj Ratan Builders
& Construction
9226772288, 8087877087, 9156882277
Office : Kazi Nagar, Jalna Road, Beed.
आमच्याकडे दर्जेदार, उत्तम क्वॉलिटीचे
विथ मटेरियल घराचे, कमर्शिअल
कॉम्प्लॅक्स व बांधकामासंदर्भात
सर्व कामे केली जातील. मराठवाड्यातील
एक विश्वसनिय कन्स्ट्रक्शन कंपनी

# चला! आपण २०२५-२६ हे वर्ष एकता, कृती आणि वारशाचे बनवूया! - अध्यक्ष : इंजि.रो.राहुल बोरा यांचे मत



रोटरी क्लब ऑफ बीड मिडटाऊन - "Unite for Good" प्रिय रोटेरियन बांधवांनो, रोटरी वर्ष २०२५-२६ साठी आपल्या क्लबचा अध्यक्ष म्हणून सेवा देण्याची संधी मिळणे, ही माझ्यासाठी एक मोठा सन्मान आणि मनापासूनची जबाबदारी आहे. "Unite for Good" या प्रेरणादायी घोषवाक्याच्या मार्गदर्शनाखाली आपण सर्वांनी एकत्र येऊन सेवा आणि सद्भावनेच्या वाटेवर चालायचे आहे. या वर्षी आपण डिस्ट्रीक्ट-३१३२ च्या उद्देष्टांशी सुसंगत असे ठोस कार्य करण्यास कटिबद्ध आहोत. सदस्य वाढ, सदस्यांचे जतन व सक्रीय सहभाग यावर विशेष भर राहील. प्रत्येक सदस्य हा आपल्या क्लबचा आत्मा आहे. आणि तुमचा सक्रीय सहभाग आपल्या यशाचा पाया ठरेल. आपली सेवा ही विविध क्षेत्रामध्ये केंद्रीत असेल.

१) पर्यावरण : स्थानिक परिस्थितीवर सकारात्मक परिणाम करणाऱ्या हरित उपक्रमात पर्यावरणात्मक बदल घडवायचा आहे.

२) मानवी विकास : शिक्षण, आरोग्य सेवा आणि सशक्तीकरणाच्या माध्यमातून जीवन उन्नतीसाठी प्रयत्न करायचा आहे.

३) सांस्कृतिक उपक्रम : परंपरा, कौशल्य आणि एकात्मतेला प्रोत्साहन देण्यासाठी विशेष प्रयत्न करायचे आहेत. आपण केवळ आपल्या क्लबपुरते मर्यादित न राहता डिस्ट्रीक्ट उपक्रमामध्येही सक्रीय सहभाग घेतला पाहिजे. डिस्ट्रीक्ट कॉन्फरन्स गोवा येथे २३ ते २५ जानेवारी २०२६ दरम्यान होणार आहे. हे नेतृत्व शिक्षण व बंधुतेचा उत्सव असेल आणि आपण सर्वांनी उपस्थित राहुन हा गौरव वाढवावा. यावर्षी आपण ग्लोबल ग्रॅण्ड प्रकल्प सुरू करण्यासाठी विशेष प्रयत्न करणार आहोत. ज्याद्वारे आपण स्थानिक कार्य करत असलो तरी जागतिक पातळीवर विचार करू शकू. तसेच द रोटरी फाऊंडेशनमध्ये आपले योगदान वाढवून रोटरीच्या ''सेवा सर्वोपरि'' या देहाची खरी अनुभूती जगभर पोहोचवू. चला आपण २०२५-२६ चे हे वर्ष एकता, कृती आणि वारशाचे बनवूया, एकत्र येऊ या आणि खऱ्या अर्थाने "Unite for Good" करत आपले स्वप्न वास्तवात आणूया.

रोटरीच्या सेवेत,

**इंजि. राहुल बोरा**
अध्यक्ष- २०२५-२६
रोटरी क्लब ऑफ बीड मिडटाऊन

# ''असेल साथ तरच बनते बात'' हेच माझं ब्रीदवाक्य राहील. सचिव-रो.डॉ.प्रकाश कोंका



रोटरी क्लब ऑफ बीड मिडटाऊनच्या सचिवपदाची जबाबदारी माझ्यावर सोपवण्यात आली, ही माझ्यासाठी सन्मानासोबतच एक मोठी जबाबदारी आहे. रोटरीत माझं हे दुसरं वर्ष असलं तरी गेल्या वर्षभरात अध्यक्ष रो. इंजि. नितीन गोपन आणि सचिव रो. डॉ. निलेश जगदाळे यांच्या मार्गदर्शनाखाली मला विविध प्रकल्पांमध्ये सक्रिय सहभागाची संधी मिळाली. त्या अनुभवाने मला रोटरीच्या कार्यपद्धतीचा, मूल्यांचा आणि संघभावनेचा जवळून परिचय झाला. तोच आत्मविश्वास आणि शिकवण या वर्षी सचिवपदाची जबाबदारी पार पाडताना मला निश्चितच उपयोगी ठरणार आहे. अध्यक्ष रो. इंजि. राहुल बोरा यांचं दूरदृष्टीपूर्ण नेतृत्व आणि सकारात्मक ऊर्जा यांच्यामुळे २०२५-२६ हे वर्ष क्लबसाठी नवे क्षितिज गाठणारे ठरेल, याची मला पूर्ण खात्री आहे. "Unite for Good" या थीम ला केंद्रस्थानी ठेवून आपण रोटरीच्या सात प्रमुख सेवाक्षेत्रांवर विशेष लक्ष केंद्रित करणार आहोत ज्यामध्ये शांतता आणि संघर्ष निवारण, रोग प्रतिबंध आणि आरोग्य सेवा, पाणी, स्वच्छता आणि आरोग्य, मातृत्व आणि बालसंगोपन, मुलभूत शिक्षण व साक्षरता, आर्थिक विकास आणि पर्यावरण संरक्षण या सेवाक्षेत्रांशी सुसंगत उपक्रमांसाठी ग्लोबल ग्रँट प्रकल्प प्रस्ताव तयार करण्याचा प्रयत्न करणार आहेत. आपण यावर्षी एकात्मतेने काम करत डिस्ट्रिक्ट-३१३२ च्या उद्दिष्ट पूर्तीसाठी प्रभावी सहभाग घेणे, तरुण सदस्यांना संधी देणे, तसेच प्रत्येक एव्हेन्यू डायरेक्टर व त्यांचे समिती सदस्य यांच्याशी समन्वय साधून प्रकल्पांची यशस्वी अंमलबजावणी करण्यावर भर देणार आहोत. क्लबसोबतच डिस्ट्रिक्ट-३१३२ पातळीवर आपली उपस्थिती ठळक करण्यासाठी सामाजिक, शैक्षणिक, आरोग्यविषयक आणि पर्यावरणपूरक उपक्रम राबवले जातील. आपल्या प्रत्येक सदस्याचा सहभाग हेच आपल्या क्लबचं खरे बळ आहे. आपण सर्व मिळून हे वर्ष रोटरी मूल्यांना साजेसं, प्रेरणादायी आणि समाजासाठी उपयोगी ठरवू. ''असेल साथ तरच बनते बात'' हेच माझं ब्रीदवाक्य राहील.

**रो.डॉ.प्रकाश कोंका**
सचिव- २०२५-२६
रोटरी क्लब ऑफ बीड मिडटाऊन



## प्रो. क्र.१ घनदाट जंगलच्या दिशेने पहिले पाऊल म्हणून ५ हजार सिडबॉल डोंगराळ भागात रोपण

१ जुलै रोजी कृषी दिन म्हणून सर्व शेतकरी बांधव साजरा करतात. शेतकरी आणि कृषी यांचं अतिशय अतुट असं नातं आहे. तसेच पाऊस चांगल्या प्रकारे पडावा म्हणून पर्यावरणाचा समतोल राखला जावा म्हणून त्याचबरोबर वृक्षाच्या माध्यमातून फळे, फुले, सावली आणि ऑक्सीजनचा मानवाला खुप मोठा फायदा आहे. हा दृष्टीकोन ठेवून बीड जिल्ह्यातील मांजरसुंबा, ढेकणमोह अशा विविध डोंगराळ भागामध्ये ५ हजार सिडबॉलचे रोपन करण्यात आले. यावेळी इन्फंट इंडियाचे अध्यक्ष दत्ता बारगजे, पतंजली योग समिती, बीड ट्रॅकर्स ग्रुप, देवराई ग्रुप व पसायदान सेवा प्रकल्प यांनी या उपक्रमामध्ये सहभाग घेतला. यावेळी अध्यक्ष रो. राहुल बोरा, सचिव रो.डॉ. प्रकाश कोंका, प्रो.चे.डॉ. शिवाजी देशमाने (पर्यावरण संचालक) व सर्व मेंबर उपस्थित होते.


आपल्या घराच्या उत्कृष्ट बांधकामासाठी निर्मिती असोसिएटची
निवड म्हणजे निर्मल, आनंदी वास्तुची निर्मिती

NIRMITI ASSOCIATES
A VISION TO YOUR DREAMS

* आमच्या सुविधा *
* सर्व प्रकारचे बिल्डींग प्लॅन
* एलिव्हेशन प्लॅन
* इंटेरिअर डिझाईन
* बांधकाम परवाना
* अंदाजपत्रक (Estimate)
* मूल्यांकन (Valuation)
* गुंठेवारी
* साहित्यासह बांधकाम (Turn-Key-Projects)

ऑफिस : राजीव गांधी चौक, भक्ती कन्स्ट्रक्शन रोड, बीड
Nirmiti Associates मो. 8007987258, 8657000070



## रोटरी नववर्षाच्या सुरुवातीसाठी पहिली क्लब असेंब्ली संपन्न



रोटरी वर्ष २५-२६ च्या पूर्व नियोजनासाठी पी.डी.जी. रो.हरिष मोटवाणी, ए.जी. रो. कल्याण कुलकर्णी, यांच्या मार्गदर्शनाखाली पहिली क्लब असेंब्ली संपन्न झाली. सर्व मेंबरवर सामाजिक कार्याची विविध जबाबदारी देण्यात आली यावेळी अध्यक्ष रो.इंजि.राहुल बोरा, सचिव रो.डॉ. प्रकाश कोंका, रो.सिए.आदेश नहार, माजी अध्यक्ष व सचिव उपस्थित होते.

## रोटरी क्लब ऑफ बीड मिडटाऊन

### ✻ नूतन संचालक मंडळ २०२५-२६ ✻

| | |
|---|---|
| रो.इंजि.राहुल बोरा | : प्रेसिडेन्ट |
| रो.डॉ.प्रकाश कोंका | : सेक्रेटरी |
| रो.सी.ए.आदेश नहार | : क्लब लर्निंग फॅसिलेटर |
| रो.भारत शेटे | : ट्रेझरर |
| रो.हरिष मोटवाणी | : क्लब ॲडव्हायजर |
| रो.इंजि.नितीन गोपन | : इमिजेट पास्ट प्रेसिडेन्ट |
| रो.डॉ.निलेश जगदाळे | : एक्झिकेटिव्ह सेक्रेटरी |
| रो.राजकुमार बंब | : व्हाईस प्रेसिडेन्ट |
| रो.प्रल्हाद कराळे | : रोटरी फाऊंडेशन डायरेक्टर |
| रो.प्रकाश मंत्री | : मेंबरशिप डायरेक्टर |
| रो.सुरेश बुद्धदेव | : पब्लिक ईमेज डायरेक्टर |
| रो.जनार्दन दहिवाळ | : क्लब ॲडमिनीस्ट्रेशन डायरेक्टर |
| रो.बालाजी घरत | : बुलेटीन एडिटर |
| रो.उमाकांत थोरात | : सर्व्हिस प्रोजेक्ट डायरेक्टर |
| रो.इंजि.अमोल तळेकर | : कम्युनिटी सर्व्हिस डायरेक्टर |
| रो.ॲड.नामदेव साबळे | : ह्युमन डेव्हलपमेंट डायरेक्टर |
| रो.सुर्यकांत महाजन | : इंटरनॅशनल सर्व्हिस डायरेक्टर |
| रो.जितेंद्र बोरा | : यंग लिडर्स कॉन्टॅक्ट डायरेक्टर |
| रो.सर्वज्ञ जोशी | : व्होकेशनल सर्व्हिस डायरेक्टर |
| रो.डॉ.अनिता शिंदे | : लिट्रसी डायरेक्टर |
| रो.बद्रीनारायण मानधने | : डिस्ट्रीक्ट ॲम्फॉसिस डायरेक्टर |
| रो.डॉ.सुरेंद्र बजाज | : विन्स ॲण्ड वॉश डायरेक्टर |
| रो.नितीन भोसले | : सार्जंट ॲट आर्म्स |
| रो.दिनेश लोळगे | : कल्चरल चेअर |
| रो.संगिता मनसबदार | : वुमन एम्पावरमेंट चेअर |
| रो.डॉ.शिवाजी देशमाने | : एन्व्हायरमेंट चेअर |
| रो.चंद्रप्रकाश सेठी | : स्पोर्टस चेअर |

सर्व संचालक मंडळाचे हार्दिक अभिनंदन..!

## प्रो. क्र.२ ३४ रोटरियननी रक्तदान करून रोटरी नववर्षाची दिमाखात सुरुवात



दि. १ जुलै २०२५ हे रोटरीची नववर्षाची सुरुवात होते. या निमित्त रोटरी क्लब ऑफ बीड मिडटाऊन, रोटरी क्लब ऑफ बीड आणि जीवन ज्योत हॉस्पिटल बीड यांच्या संयुक्त विद्यमाने सकाळी ९ ते १ वाजेपर्यंत भव्य दिव्य रक्तदान शिबीराचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी स्वखुषीने, आनंदात आणि उत्साहाच्या वातावरणात ३४ रोटरीयननी रक्तदान केले. यावेळी अध्यक्ष रो. राहुल बोरा, सचिव रो. डॉ. प्रकाश कोंका, प्रो.चे. रो. डॉ. किरण सवासे, रोटरी क्लब ऑफ बीडचे अध्यक्ष रो. विकास उमापुरकर, सचिव रो. सुमित जैस्वाल, प्रो.चे.रो. अक्षय शेटे तसेच मावळते अध्यक्ष, सचिव रो. इंजि. नितीन गोपन, रो.डॉ. निलेश जगदाळे आणि बहुसंख्य मेंबर उपस्थित होते. नवीन रोटरी मेंबर श्रीमती विशाखा सुर्यवंशी यांनी रक्तदान शिबीरामध्ये पहिल्याच दिवशी रक्तदान करून सहभाग घेतला.

### रोटरी क्लबतर्फे सर्व ॲनेटस्‌ना वाढदिवसाच्या शुभेच्छा!

कु.सय्यदा इशरदजहान- ३ जुलै
चि.शाहरुख रब्बानी शेख- ७ जुलै
कु. उन्नती बुद्धदेव- ९ जुलै
कु. आवंती मुंजे- १२ जुलै
कु. सृष्टी चिलवंत- १२ जुलै
श्री. महेश मानधने- २५ जुलै
चि. निकुंज कराळे- २७ जुलै
चि. नयन कराळे- २७ जुलै

### रोटरी क्लबतर्फे सर्व ॲन्स यांना वाढदिवसाच्या शुभेच्छा!

सौ. मनोरमा काबरा- १ जुलै
सौ. अम्रजा पुजारी- ३ जुलै
सौ. हर्षाली तळेकर- ६ जुलै
सौ. सुरेखा परभणे- २१ जुलै
सौ. मेघा खिंवसरा- २३ जुलै

### रोटरी क्लबतर्फे सर्व रोटरीयन व ॲन्स यांना लग्न वाढदिवसाच्या शुभेच्छा!

रो. सर्वज्ञ जोशी- ४ जुलै
रो. मिलींद करकाळकर- ६ जुलै
रो. मनोज थिगळे- ७ जुलै
रो. सय्यद फारुख- १७ जुलै

### रोटरी क्लबतर्फे सर्व मेंबर्सना वाढदिवसाच्या शुभेच्छा!

रो. हितेश ठक्कर- १ जुलै
रो. भगिरथ चरखा- १ जुलै
रो. मनोजकुमार अग्रवाल-१ जुलै
रो.डॉ. प्रदीप आघाव- १ जुलै
रो. प्रल्हाद कराळे- ४ जुलै
रो.डॉ.स्वप्नील उन्हाळे- ५ जुलै
रो.सौ. साधना बोरा- १४ जुलै
रो. सुनिल पारख- १५ जुलै
रो.इंजि.संजय खांदाट- १८ जुलै
रो. बद्रीनारायण मानधने-१९ जुलै
रो. संजय गुप्ता- २३ जुलै
रो. राहुल कुलकर्णी- २९ जुलै
रो. मनोज थिगळे- ३१ जुलै

स्टॉकिस्ट ॲन्ड डिलर्स
✻कारपेट ✻मॅटींग
✻फोम ✻कुशन ✻क्वायर
✻रेडीमेड पडदे
✻रेक्झीन ✻बेड शिट्स
✻गादी ✻वेलवेट
✻फर्निशिंग ✻वॉलपेपर

सजावट
गृह सजावटीचे भव्य दालन
मुनोत कॉम्प्लेक्स, पुना गाडगीळच्या खाली,
सुभाष रोड, बीड - ४३१ १२२

रौप्य महोत्सवी वर्षात यशस्वी पदार्पण...
चंद्रप्रकाश सेठी
मो. 7588 85 85 85
9511 809 409